# लिंगायत भक्ति चळवळीत श्री लक्ष्मण महाराज यांच्या कार्याचे योगदान : एक विशेष अभ्यास.

संशोधक विद्यार्थी
माधव दत्तात्रय मोरे
भाषा, साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल
स्वा.रा. ती. म. नांदेड

मराठी साहित्य निर्मिती आणि भक्तिसंप्रदायाचा उगम एकच वेळेस झालेला पहावयास मिळतो. महाराष्ट्रामध्ये महानुभाव, वारकरी, नाथ दत्त, सुफी, लिंगायत भक्तिसंप्रदाय प्रत्यक संप्रदायाने स्वतःचे असे स्वतःत्र तत्वज्ञान निर्माण केले. काही संप्रदाय द्वैतवादी तर काही अद्वैतवादी आहेत. आपल्या तत्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार जनमानसात करण्यासाठी त्यांनी मांतृभाषेचा स्विकार केला, आणि साहित्यनिर्मीती केली. संतांच्या साहित्यनिर्मीतीची पंरपरा 12 व्या शतकापासून ते 20 व्या शतकापर्यंत अखंडपणे पहावयास मिळते, ही परंपरा वेगवेगळया संप्रदायातील संताचा अहे हे इथे नमुद करणे महत्वाचे आहे. या साहित्य निर्मीतीच्या कालखंडात फार मोठया प्रमाणात राजकीय स्थित्यंतरही झालेली पहावयास मिळतात. यादवांच्या कालखंडापासून संत साहित्याची निर्मीतीची सुरुवात असली तरी अगदी अलिकडे इंग्रज राजवटीपर्यत संताचे साहित्य निर्माण झालेले पहावयास मिळते. या मधल्याकाळात यादव,यवन,मराठे, पेशवाई इंग्रज या राजवटी महाराष्ट्रात राज्यकारभार करत होत्या. या दरम्यान 16 व्या शतकात मोठया प्रमाणात प्रवर्तीत झालेली लिंगायत भक्ती चळवळीची धूरा 19 व्या शतकात श्री लक्ष्मण महाराज यांच्या खांदयावर आली आणि त्यांनी समर्पकपणे ती पेलली.

## निबंधाचे उद्दिष्टः—

19 व्या शतकाच्या सुरुवातीलांच लक्ष्मण महाराजांचा जन्म झाला. त्यानी लिंगायत धर्माची दीक्षा घेवून लिंगायत तत्वज्ञानांचा आणि विचारांचा प्रचार व प्रसार केला, त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे हाच प्रस्तूत निबंधाचा उद्देश आहे.

## निबंधाच्या मर्यादा : —

हा निबंध लिंगायात संप्रदायात श्री लक्ष्मण महाराज यांच्या कार्याच्या अभ्यासापूरता मर्यादित आहे.

## संशोधन पध्दती :—

प्रस्तुत निबंधाच्या अभ्यास हा संतसाहित्याचा असून तो एतिहासीक आहे. संशोधकाने प्रस्तुत निबंध संशोधनासाठी विश्लेषणात्मक ऐतिहासीक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

## लक्ष्मण महाराज जीवनकार्य

श्री लक्ष्मण महाराज यांचा जन्म धोतरजोडयाची आष्ठी ता. परतूर जि जालना येथे शके 1730 (इ.स. 1808) मध्ये झाला, त्यांच्या आईचे नाव बजबाई आणि वडिलाचं नाव कृष्णाप्पा हे आहे. लिंगायत कुटुंबामध्ये जन्म झाल्याने लक्ष्मणांच्या मनावर लहानपणीचे धर्म संस्कार झाले. वडीलांच्या आग्रहामुळे त्यांनी शाळा शिकली, वयाच्या 18 व्या वर्षी त्यांचे लग्न झाले लहानपणापासून विरक्तविचारांचे असल्यामुळे त्यांचे संसारात मन लागत नाही. त्यांनी अस्वस्थ होवून घराचा त्याग केला थेट देवूळगाव राजा येथे गेले तेथील मठातील दमय्या स्वामीकडुन त्यांनी अनूग्रह घेतला खामगाव येथील दुकानात मुनिमकी स्विकारली पण इथे ही मन न लागल्यामुळे प्राचीन ऐतिहासीक पलसिध्दमठामध्ये गेले. मठाधीपती गंगाधर स्वामींनी त्यांना आश्रय दिला. मठाचे कारभारी रेवनसिध्दच्या यांच्या अनुमतीने

तेथील मठातील ग्रंथसंपदा अभ्यासण्यास त्यांनी सुरूवात केली.

येथून पलसिध्दस्वामीच्या प्रेरणेतून त्यांनी अंभग लिखाण केले. व सिध्देश्वरमहात्म्य हे पलसिध्दांचे सात अध्यायी चरित्र लिहले मध्यंतरीच्या काळात वडील वारल्याने त्यांची आई,भाऊ, पत्नी त्यांच्या भेटीला आष्टीवरून साखरखर्डाला आले मठाधीपती गुरू गंगाधरस्वामीच्या सांगण्यावरून ते आष्ठीला आले बंधूच्या द्रव्यातून शके 1783 ला सिध्देश्वर मंदीर बाधले पुढील आध्यात्मीक कार्य पूर्ण करण्यासाठी शके 1784 ला भारत भ्रमण करायाला गेले ही त्यांची धर्मजागृती पदयात्रा हाये. बऱ्याचकाळ भजन कोर्तन करून त्यांनी शके 1800 समाधी घेतली आष्टी येथे नंदीनी नदोच्याकाठी त्यांची समाधी आहे.

वाङ्मयीन कार्य : —

लक्ष्मण महाराज घराचा त्याग करून साखरखेडा येथील मठात गेले तेव्हा त्यांचे वय साधरणता 29—30 वर्षाचे असावे तेथेच त्यांना काव्यनिर्मीतीची प्रेरणा मिळाली पुढे त्यांनी 40 ते 41 वर्षे काव्यनिर्मीती केली असावी ऐवढया मोठया विपूल कालखंडात त्यांचे मोठया प्रमाणात लेखन केले. त्यांच्या काव्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे करता येईल.

स्फुट रचना / स्फुट अंभग या मध्ये मंगलाचरण (26), सदगुरू (225), शिव (484), आत्मनिवेदन (570), उपदेश (456), गंगामहात्म्य (362), स्तुतीपर अंभग (545), कथात्मक अंभग (641) एवढी आहे. मराठी पदे (112), हिदुस्थानी पदे (108), कथात्मक पदे (6), भुपाळया 40, रूपके 2.0, वासुदेव 387, अष्टक 31 आरत्या 115, गौळण्चाल 3, आर्या 27 ही त्यांची अभंग रचना असून ओवीरचना ही त्यांच्या नावावर आहे. त्यांनी ओवीबध्द केलेल्या रचना यामध्ये श्री सिध्देश्वर माहात्म्य, सिध्दस्त्रोत, गुरूस्त्रोत, शिवस्त्रोत, परमेश्वर स्त्रोत, अशी विपूल आणि वैविध्यपूर्ण रचना त्यांच्या नावावर आज उपलब्ध आहे वरील वाङ्मयाचे विश्लेषण हे शें. दे. पसारकर संपादीत लक्ष्मण गाथा या ग्रंथामध्ये आलेले आहे.

लक्ष्मण महाराजांच्या भक्ती चळवळीचे स्वरूपः

लक्ष्मण महाराजांच्या भक्तिचळवळीचे स्वरूप ईश्वर भक्तितुन प्रेरीत झाले. असते तरी त्यांनी रचलेल्या वाङ्मयतून अनेक सामाजिक परिवर्तनाचा घ्यास त्यांनी रचला होता त्याला त्यांच वाङ्मय साक्ष आहे प्रापांचिक जोवन आणि पारधार्मिक जोवन या दोन्ही गोष्टी त्यांच्या जोवनावर प्रभाव पाडणऱ्या आहेत. त्यांनी ईश्वर भक्ति बरोबरच उपदेशपर अभंग ही रचले आहेत. या सर्व वाङ्मयाचा अभ्यास करतांना तत्कालीन समाज जोवन आणि राजकिय जोवनाचाही परामर्श घेणे क्रमप्राप्त ठरतो.

लक्ष्मण महाराजांचा आधात्मिक उन्नतीचा आणि धर्मकार्याचा कालखंड हा प्रबोधनाचे शतक होता, या काळामध्ये भारतावर इंग्रजराजवट स्थिर झाली होती यापूर्वी भारतीय समाज अनेक राजकीय संकटाला तोंड देत होता, त्याच बरोबर समाजामध्ये अनेक देवदेवतांचे पुजन, अधश्रध्दा, बुवाबाजी, यज्ञयाग यामुळे समाज पिळवून निघाला होता. समाजाची आर्थीक स्थिती बिकट झाली होती या परिस्थितीचा फायदा घेवून समाजात नवचैतन्य निर्माण करणे आणि धर्म प्रचार करण्याच्या हेतुने अनेक खिश्चन मशिनरो शिक्षण दण्याचे काम करत होत्या. पेशवाईचा अंत झाल्यामुळे महाराष्टभभत प्रबोधन काळाला सुरूवात झाली होती वारकरी संप्रदाय सोडला तर इतर भक्तिसंप्रदायाचा प्रभाव समाजावरून कमी झाला होता. याच कालखंडात मराठवाडयावर निजामराजवट राज्यकरत होती अशा परिवर्तनाच्या कालखंडामध्ये आष्टावर, पंचाचार आणि शट्स्थल अशा अवैदीक तत्वज्ञानाची मांडणी करून प्रचार आणि प्रसाराचे कार्य समाजात त्यांनी केले. त्यांची कर्मभूमी प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भाचा काही भाग अशी होती, त्यांनी विपूल प्रमाणात साहित्य रचना करून भजन किर्तनाच्या माधमातून बसवेश्वरांच्या कल्यानक्रांतीतून आलेले

स्वातत्र, समता, बधुता,या मुल्याचा प्रचार व प्रसार केला. समाज प्रबोंधनासाठी त्यांनी तोर्थयात्रा काढली ही तीर्थयात्रा म्हणजेच गोदावरीच्या उगमापासून ते किष्कींदा पर्यतच्या दोन्ही तोरावरील तोर्थक्षत्र व देवालयांच्या नावांच्या नोंदी त्यानी 362 अभंगातुन केल्या आहेत.

इस्लामीक राजवट असल्यामुळे आणि मुळात समाजवार रूजलेल्या वैदिक परंपरेला विरोध करून समाजावर वाड्मयाच्या आधारे कोर्तन, प्रवचन देवून आत्मविश्वास, धार्मिक स्वातंत्र्य, बंधूप्रेम या मुल्यांचे रूजवणूक करण्याचे अतिशय बिकट कार्य लक्ष्मण महाराजानी प्रबोधनाच्या काळात केले.

हे मानवतावादी कार्य करण्यासाठी लिंगायात भक्तीचळवळीचा स्विकार करून मानवतावादी मूल्याना समाजावर रूजवण्याचे कार्य केले.

संदर्भ ग्रंथ

1. प्रा.डॉ.सु.सो.मोगलेवार वीरशैव विश्वकोश खंड एक
2. रा.चि. ढेरे प्राचीन मराठीच्या नवधारा, मोधे प्रकाशन कोल्हापूर
3. डॉ भी शि स्वामि लक्ष्मण महाराज व्यक्ती आणि वाङ्मय, शैवभारती शोध प्रतिष्ठान, जंगमवाडी मंठ, वाराणशी जुलै 1994
4. डॉ. शे. दे पसारकर संपादीत श्री लक्ष्मण महाराजगाथा प्रथमावृत्ती 21 मे 2001 प्रस्तावना
5 डॉ.शिवलिंग शिवाचार्य संपादीत सप्तरत्न गाथा संस्कृती प्रकाशन अहमदपुर